महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (TM)

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## बारामती परिमंडळ, बारामती.

CIN: U40109MH2005SGC153645
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

दाखल तारीख :–०२/०५/२०१९
आदेश तारीख :–03/०६/२०१९

**आदेश**

केस क्र. ०९/२०१९

| | |
|---|---|
| १) श्री.नथू सदू चव्हाण .,<br>घर नं. ९१९ कवठे (विठ्ठलवाडी),<br>ता– वाई, जि. सातारा. | तक्रार अर्जदार (ग्राहक) |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता.,<br>म.रा.वि.वि.कं.मर्या,<br>वाई विभागीय कार्यालय. | विरुध्द पक्षकार (महावितरण) |

कोरम:– १) श्री. बी. डी. गायकवाड, अध्यक्ष,
२) श्री. एस. के. जाधव, ग्राहक सदस्य,
३) श्री. एम. ए. लवटे, सदस्य सचिव,

उपस्थिती:– १) श्री. दिलिप नथूराम चव्हाण, ग्राहक प्रतिनिधी
२) श्री. ए. एस. खुस्पे, उप. का.अ., म.रा.वि.वि.कं.मर्या. वाई उपविभाग.
३) श्री. एन. व्ही. देशमुख, क.अ. केजंळ शाखा म.रा.वि.वि.कं.मर्या.

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६, मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## तक्रारीचे स्वरुप

१) तक्रारदार ग्राहक श्री. नथू सदू चव्हाण घर नं ९१९ कवठे (विठ्ठलवाडी), ता. वाई, जि. सातारा ग्राहक क्र. १९३०६१९६४०९९ चे घरगुती वीजजोड असून वीज पुरवठा खंडीत राहतो, २४ तास वीजपुरवठा मिळावा. वीज पुरवठा खंडीत कालावधीची नुसकान भरपाई (एसओपी) मिळावी अशी तक्रार दाखल केली आहे.

## तक्रार अर्जदार (ग्राहक) यांचा तोंडी व लेखी युक्तीवाद

श्री. नथू सदू चव्हाण घर नं ९१९ कवठे (विठ्ठलवाडी), ता. वाई, जि. सातारा यांचे वतीने ग्राहक प्रतिनिधी श्री. दिलीप नथूराम चव्हाण यांनी म्हणणे मांडले की, माझे ग्राहक क्रं. १९३०६१९६४०९९ ने घरगुती वीज जोड दि. १९.४.२००३ रोजी घेतलेला आहे. परंतू त्यामध्ये वारंवार खंड पडत आहे. त्याबाबत संबधीत कार्यालयाला नेहमीच तोंडी तक्रार करीत असतो. परंतू खंडीत पुरवठयाचा त्रास कमी होत नाही. कंपनीकडून वीज पुरवठा खंडीत झाल्याची नोंद होण्याची कोणतीही स्वयंचलीत यंत्रणा नाही. मी आपला नियमित वीजबील भरणारा ग्राहक आहे. मला होत असलेल्या त्रासाबदल मजला नुसकान भरपाई मिळावी. मजला २४ तास वीजपुरवठा मिळावा, खंडीत झालेल्या वीज पुरवठयाची नुसकान भरपाई (एसओपी) मिळावी.

## विरुध्द पक्षकार (महावितरण) यांचा तोंडी व लेखी युक्तीवाद

श्री. नथु सदु चव्हाण, रा. कवठे, ता. वाई, जि. सातारा यांनी सादर केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जाब देणार यांचे म्हणणे असे की, श्री. नथु सदु चव्हाण यांचे घर गावठाणात नसून शेतात आहे. सदरील कनेक्शन दि. १९.०४.२००३ रोजी देण्यात आलेले आहे. त्यानंतर शासन व महावितरण कंपनीच्या योजनेनुसार गावठाण व शेतीपंप वाहीनी विलगीकरण योजनेअंतर्गत सन २०११–२०१२ साली गावठाण क्षेत्रातील व २०–२५ घरे असलेल्या वाडी वस्तीवरील घरगुती वीज कनेक्शन गावठाण फिडरला जोडून २४ तास वीज पुरवठा करण्याची कामे पूर्ण करण्यात आली. तसेच शेतामध्ये असलेली शेत घरे किंवा ३–४ घरगुती कनेक्शन असलेल्या छोटया वाडयांसाठी व ज्यांना गावठाण वाहिनीवर स्थलांतरीत करण्याकरीता लागणाऱ्या लघुदाब वाहिनीच्या पोलची संख्या जास्त आहे अशी कनेक्शन शेतीपंप वाहिनी सेपरेशन योजनेतंर्गत करण्यात आली.

याच योजने अंतर्गत सदर अर्जदाराचे कनेक्शन हे शेतामध्ये असणाऱ्या शेतघरात असल्याने व ते गावठाण वाहीनीवर घेण्यासाठी सदर योजनेच्या कालावधीत म्हणजेच सन २०११–२०१२ साली सुमारे १५ पोलची लघुदाब वाहिनी उभारणी करावी लागत असल्याने सदर योजनेतील नियमाप्रमाणे या ग्राहकास शेतीपंप वाहिनीदवारे एसडीटी मार्फत वीज पुरवठा करण्यात येत आहे. व या फिडरवर नियमानुसार वरीष्ठ कार्यालयाकडून भारनियमनाचे आदेश आल्यावरच भारनियमन करण्यात येत आहे. अन्यथा ३ फेज वीज पुरवठया व्यतिरीक्त सिंगल फेज वीज पुरवठा नियमितपणे पुर्णवेळ दिला जातो. तथापि नैसर्गिक आपत्ती अथवा

पावसाळयात वीज पुरवठा कधीतरी खंडीत होत असुन सदर ठिकाणचा वीज पुरवठा सुरळित करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात येतात.

सद्यस्थितीत श्री. चव्हाण यांचे शेतघराजवळ श्री. ओसवाल यांचे बंगलो स्कीमसाठी त्यांनी स्वखर्चाने लघुदाब वाहिनी तयार केली असल्याने सद्यस्थितीत तेथून अर्जदाराचे कनेक्शन गावठाण वाहिनीस जोडण्यासाठी ६ पोलची लघुदाब वाहिनी उभारणी करणे गरजेचे आहे. परंतू सद्यस्थितीत कोणतीही योजना नसल्याने सदरची वाहिनी उभारणी महावितरणमार्फत करता येत नाही. त्यामुळे अर्जदाराने सदरील वाहिनी स्वखर्चाने तयार करणेबाबत महावितरणचे शाखाधिकारी कवढे यांनी पत्र क्र. कअ/कवठे/तां/९३, दि. २४/०७/२०१८ अन्वये कळविले आहे. तथापी सदरील वीजवाहिनी स्वखर्चाने उभारणी करणेबाबत अर्जदाराची सहमती नसल्यास शेतीपंप वाहिनीवरील घरे गावठाण वाहिनीवर स्थलांतरीत करणेकरिता कोणतीही योजना उपलब्ध झाल्यास तातडीने अर्जदाराचे कनेक्शन गावठाण वाहिनीवर जोडण्याचे अंदाजपत्रक मंजूर करुन घेवून सदर ग्राहकाची वीज जोडणी स्थलांतरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

## कारणमिमांसा

तक्रारदार ग्राहक नथू सदू चव्हाण यांच्या घरगुती वीज जोडणीसाठी अखंड वीज पुरवठा होत नाही. वीज पुरवठा खंडीत झाला की, संबंधीत वायरमनला फोन करुन कळवित असतो. त्याबाबत सबंधीत कार्यालयाला नेहमीच तोंडी तक्रार करीत असतो. यावर जाबदेणार यांचे म्हणणे असे की, या ग्राहकास शेतीपंप वाहिनीद्वारे एसडीटी मार्फत वीज पुरवठा करण्यात येत आहे व या फिडरवर नियमानुसार वरिष्ठ कार्यालयाकडून भारनियमनाचे आदेश आल्यावरच भारनियमन करण्यात येत आहे. थ्री फेज वीज पुरवठयाव्यतिरिक्त सिंगल फेज वीज पुरवठा नियमितपणे पुर्ण वेळ दिला जातो. नैसर्गिक आपत्ती अथवा पावसाळयात वीज पुरवठा खंडीत झाल्यास तातडीने वीज पुरवठा सुरळीत करण्याची उपाय योजना केली जाते. ही कृती ग्राहक हिताची आहे असे मंचास वाटते.

ग्राहकाने २४ तास वीज पुरवठयाची मागणी केलेली आहे. या मागणीसाठी तक्रारदाराचे कनेक्शन गावठाण वाहिणीस जोडण्यासाठी ६ पोल लघुदाब वाहिनी उभारणी करणे गरजेचे आहे. परंतू सद्यस्थितीत कोणतीही योजना नसल्याने महावितरण मार्फत उभारणी करता येत नाही. अर्जदाराने सदरील वाहिनी स्वखर्चाने तयार करणेबाबत शाखाधिकारी यांनी पत्राद्वारे कळविले आहे. याबाबत तक्रारदार ग्राहकाने असमर्थता दर्शविली आहे. यावर जाब देणारे यांनी म्हटले आहे की, शेतीपंप वाहिनीवरील घरे गावठाण वाहिनीवर स्थलातरीत करणे करीता कोणतीही योजना उपलब्ध झाल्यास तातडीने अर्जदराचे कनेक्शन गावठाण वाहिनीवर जोडण्याचे अंदाजपत्रक मंजूर करुन घेवून सदर तक्रारदाराची वीज जोडणी स्थंलातरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल. हे काम प्राधान्याने करावे असे मंचास वाटते.

वीज पुरवठा खंडीत झाल्याचा एसओपी (भरपाई) मिळावी अशी मागणी तक्रारदाराने केली आहे. वास्तविक पाहता **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधरण भाग चार 'क' दिनांक २० मे २०१४ मधील परिशिष्ठ 'अ' मधील खंडीत झालेला विद्युत पुरवठा पुर्ववत करणेसाठी निश्चित केलेला कालावधी व तदनंतर प्रत्यक्षात किती तास वीज पुरवठा पुर्ववत झाला नाही.** हे तक्रारदाराने कागदपत्राच्या आधारे दाखवून दिले नाही. त्यामुळे तक्रारदाराची एसओपीची मागणी मंच मान्य करु शकत नाही.

मंच पुढील आदेश करीत आहे

## आदेश

१) तक्रार नामंजूर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| (श्री. बी. डी. गायकवाड) | (श्री. एस. के. जाधव ) | (श्री. एम. ए. लवटे ) |
| अध्यक्ष | ग्राहक सदस्य, | सदस्य सचिव |

वरील आदेश आपणास मान्या नसल्यास विद्युत लोकपाल मुंबई यांच्याकडे ६० दिवसाच्या आत अपिल दाखल करु शकता.

विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र राज्य नियामक आयोग,
६०६/६०८, केशव बिल्डींग,
बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स, बांद्रा (ईस्ट),
मुंबई–५१.